पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/०४/कावि/५३९/२०२१
दिनांक- २९/११/२०२१

प्रति,
मा.....................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दि.**०३/१२/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा शुक्रवार, दिनांक **०३/१२/२०२१** रोजी **दु.३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- ०२

**दिनांक : ०३/१२/२०२१** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा शुक्रवार, दिनांक **०३/१२/२०२१** रोजी **दु.३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) मा.विधी समितीची सभा (**कार्यपत्रिका क्रमांक २२**) दिनांक १८/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.

ब) मा.विधी समितीची सभा (**कार्यपत्रिका क्रमांक ०१**) दिनांक १८/११/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----------

विषय क्र.१) आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पांतर्गत चिखली येथे उभारवयाच्या जलशुद्धीकरण केंद्रासाठी देहू येथील नदीतून जल उपसा करून पाईपलाईन द्वारे पाणी आणणे व इतर अनुषंगिक कामे करणे. या कामांतर्गत देहू येथील बोडकेवाडी बंधाऱ्या जवळ अशुध्द जल उपसा केंद्र ते चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्र पर्यंत रायझिंग मेन पाईप लाईन टाकणेचे काम मे.रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. हे ठेकेदार कामाचे आदेश क्र. पापु/०८/कावि/११०३/२०१९, दि.२१/११/२०१९ अन्वये करीत आहे. सदर कामामध्ये १४०० मि.मी. व १२५० मि.मी. व्यासाचे लोखंडी पाईप पुरविणे व जोडणी करणेचा समावेश आहे. सदर कामाचे मे. डी.आर.ए. कन्सल्टंट हे प्रकल्प सल्लागार आहे. सदरचे काम चिखली येथील जलशुध्दीकरण केंद्र ते देहू पर्यत १४०० मि.मी. जलवाहिनी टाकणेचे आहे. तसेच देवेंद्र राणे चौक ते निघोजे-तळवडे पर्यंत १२५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे चे काम अंतिम टप्प्यात आहे. महानगरपालिकेचे देहू (बोडकेवाडी) येथील के.टी.वेअर येथे आंद्रा पाणीपुरवठा योजनेचे हेडवर्क्स बांधणेचे नियोजन केले होते. तथापि सदर ठिकाणी मुंबई उच्च न्यायालयात श्री. बोडके कुटूंबीय यांनी याचिका दाखल केली आहे. सदर याचिकेचा निकाल लवकर लागत नसल्याने व श्री. बोडके हे महानगरपालिकेने सहकार्य करणार नसल्याने लक्षात आल्यानंतर

महानगरपालिकेने बोडकेवाडी ते निघोजे तळवडे येथील विविध ठिकाणच्या केटीवेअर मधून अशुध्द जलउपसा करणेचा पर्याय यांचा अभ्यास करुन निघोजे-तळवडे येथून पाणी उपसा करणेचा पर्याय अंतिम केला त्यानंतर तेथे हेडवर्क्स बांधणेकामी जागा ताब्यात घेणे जलसंपदा विभागाची उदभव बदलास परवानगी घेणे इ. बाबींची पुर्तता केली आहे. विषयांकित काम हे चिखली जलशुध्दीकरण केंद्र ते बोडकेवाडी देहू पर्यंत करणेचे नियोजन होते. तथापि सदर काम चिखली जलशुध्दीकरण केंद्र ते निघोजे-तळवडे येथील हेडवर्क्स पर्यंत करणेत येणार आहे. सदर काम वेगाने सुरु असून प्रगतीपथावर आहे. सदर कामामध्ये सुमारे ३.४० कि.मी. लांबीच्या लोखंडी पाईपची बचत होत आहे. आंद्रा धरणाचे पाणी निघोजे-तळवडे येथील के.टी.वेअर मधून उचलून चिखली येथील जलशुध्दीकरण केंद्रात आणून शुध्द करणेत येणार आहे. सदर कामे माहे मार्च २०२२ पर्यंत पुर्ण करणेचे नियोजन आहे. तथापि सदर शुध्द पाणी नागरिकांपर्यंत पोहचविणेसाठी वितरण व्यवस्था उपलब्ध नाही. या सर्व बाबींचा विचार करुन सोनवणे वस्ती (देहू आळंदी रस्ता) ते स्पाईन रोड (चिखली घरकुल योजना) पर्यंत जलवाहिनी टाकूण ती स्पाईन रोडवरील (चिखली घरकुल योजना) मनपाच्या अस्तित्वातील जलवाहिनीस जोडल्यास व से. क्र.२३ वरुन येणारा पाणीपुरवठा बंद करुन चिखली येथील जलशुध्दीकरणाचे शुध्द पाणी नागरिकांना देता येईल. याबाबत सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. मे.डी.आर.ए. कन्सल्टंट यांनी त्यांचेकडील पत्र दि.१४/१०/२०२१ चे पत्रान्वये अभिप्राय दिला आहे. सदर काम तातडीने करावयाचे असल्याने मे. रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचे कामाचे होणा-या बचतीमधून सदरचे काम करता येईल. तसेच याकामी मनपा क्षेत्रात इतरत्र जागोजागी व्हॉल्स बसविणे, पाईपलाईनची आवश्यकती नुसार जागोजागी जोडणी करावी लागणार आहे. यासाठी नव्याने निविदा प्रसिध्द करावी लागणार नाही. मूळ निविदेतील निविदा रक्कमेपर्यंत काम करणेत येईल. तरी विषयांकित कामामधून सोनवणे वस्ती (देहू-आंळदी रस्ता) ते स्पाईन रोड (घरकुल योजना) पर्यंत तसेच मनपा क्षेत्रात इतरत्र आवश्यकतेनुसार जागोजागी व्हॉल्स बसविणे व लोखंडी पाईपलाईनची जोडणी करणेच्या स्थळ बदलास मान्यता देणेकामी विचार करणे.


विषय क्र.२) जिजामाता हॉस्पीटल येथील कोवीड-19 करिता विद्युत व्यवस्थेचे चालन देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे या कामास मा.विधी समिती सभा ठराव क्र.32, दि.16/04/2021 अन्वये र.रू.24,98,707/- यास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तथापि दि.19/10/2021 रोजी मा. आयुक्त कक्षात झालेल्या बैठकीत मा. आयुक्त सो यांनी जिजामाता रूग्णालयातील २ ऑपरेशन थिएटर ३१ डिसेंबर २०२१ पूर्वी सुरू करणेबाबत आदेश दिलेले आहे. ऑपरेशन थिअटरमधील वातानुकुलन

यंत्रणेसाठी आवश्यक एस.एस.प्लेनम, डक्टींग, ग्रील इ. कामाकाज तातडीने करणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपरेशन थेटर सुरू करणे शक्य होणार नाही. सदरचे काम करणेसाठी अंदाजे र.रू.18,15,324/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तातडीची बाब असल्याने विषयांकित कामातूनच मा. स्थायी समिती सभेच्या उमेद मान्यतेवर सदरचे वाढीव काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे विषयांकित कामास एकूण र.रू.43,14,031/- एवढ्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. सदर वाढीव खर्च करणेस मा.आयुक्त सो यांनी दि.२५/१०/२०२१ च्या प्रस्तावान्वये मंजूरी दिलेली आहे. सदर कामाचा खर्च भांडार विभागाकडील कोवीड-19 या लेखाशीर्षातून करणेकामी येणा-या र.रू.43,14,031/- यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) निवडणूक विभागाकडील पत्र क्र.सार्व.नि.२०२२/कावि/१३/२०२१, दि.१२/१०/२०२१ अन्वये मनपाच्या संभाव्य निवडणूक २०२२ ची पूर्वतयारी म्हणून निवडणूक निर्णय कार्यालय, मतमोजणी कार्यालय, निवडणूक केंद्र इ. ठिकाणी विद्युत विषयक कामे करणेसाठी कामाचे अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. ग क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणा-या निवडणूक कार्यालय, मतमोजणी कार्यालयात आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात ध्वनीक्षेपण व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही आणि जनरेटर व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्याकामी विषयांकित कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यास र.रू.24,99,542/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सबब या कामी र.रू.25,00,000/- यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागामार्फत शहरामध्ये खाजगी व महानगरपालिकेच्या जागेवर बाह्य जाहिरातीसाठी फलक लावणेस (OutdoorAdvertising) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमातील कलम २४४, २४५ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ नुसार परवानगी दिली जाते. सध्या पिंपरी चिंचवड शहराचा स्मार्ट सिटीत समावेश झाला आहे. महापालिकेचे २०१८ मध्ये जाहिरात फलकासाठी (OutdoorAdvertising) बाह्य जाहिरात धोरण (Outdoor Advertising Policy) ठरविणेत आलेले आहे. त्यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश व शहर सौंदर्यीकरण तसेच महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी नव्याने जाहिरात धोरण निश्चित करणे आवश्यक आहे म्हणून नव्याने जाहिरात धोरण (Outdoor Advertising Policy) तयार करणेत आलेले आहे. त्यास कायदा विभागाकडून तपासून घेणेत आलेले आहे. सबब, पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागामार्फत तयार करणेत आलेले बाह्य जाहिरात धोरण (Outdoor Advertising Policy) सोबतच्या प्रपत्र “अ” मध्ये (मराठी व इंग्रजी) सादर करणेत आलेले आहे. त्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/०४/कावि/५३९/२०२१
दिनांक- २९/११/२०२१ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.